# प्रकरण पाचवे

# अनंत मनोहर यांच्या प्रस्तुत कथांतील व्यक्तिचित्रणे आणि सामाजिक संदर्भ यांचा विचार

## प्रकरण पाचवे

## अनंत मनोहर यांच्या प्रस्तुत कथांतील व्यक्तिचित्रणे आणि सामाजिक संदर्भ यांचा विचार

अनंत मनोहरांच्या कथांतील व्यक्तिचित्रणे ही सहजरित्या परिस्थितीला अनुरूप अशी आलेली असतात. स्त्री-पुरुषांच्या वागण्यातून, बोलण्यातून त्या कथांतील पात्रांचा सहजपणा आपल्याला जाणवतो. वेगवेगळ्या स्तरांतील, वेगवेगळ्या समाजातील व्यक्तिचित्रणे त्यांनी रेखाटली आहेत. अगदी खालच्या स्तरापासून ते उच्चशिक्षित असलेल्या पांढरपेशा समाजातील लोकांची व्यक्तिचित्रणे कथेत आली आहेत. समाजातील परिस्थितीने माणूस घडतो. सामाजिक संदर्भ लक्षात घेता ह्या व्यक्ती आपल्यातीलच कोणी एक आहेत असे वाटण्याइतपत त्यांनी व्यक्तिचित्रणे रंगविली आहेत. त्यांच्या कथेत सामाजिक संदर्भ व सांस्कृतिक संदर्भ हा येतोच. यातून समाजातील वास्तवता स्पष्ट होते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक बदलामुळे समाजावर होणारा परिणाम हा साहित्यातून उमटत असतो. त्या परिणामातूनच कथेतील पात्रे घडत असतात. सामाजिक परिस्थितीमुळे माणूस शिकतो, सुधारतो. त्यांच्या कथेत येणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वांत एक धारदारपणा जाणवतो. समाजामुळेच समाजाचे व्यक्तिमत्त्व विकसित होत असते. मध्यमवर्गीय, शहरी जीवनात राहणाऱ्या स्त्री-पुरुषांची व्यक्तिचित्रणे कथेत आली आहेत.

### अ) अनंत मनोहरांच्या कथेतील स्त्री व्यक्तिचित्रणे -

१) समाजातील प्रथा, रूढी, परंपराना यांना विरोध करणाऱ्या स्त्रिया.

शर्त (देवकाठी) या कथेतील विदेशा प्रधान स्त्री ही आधुनिक विचारसरणीची आहे. त्यामुळे हुंडा देऊन लग्न करणे म्हणजे शोभेची बाहुली बनून राहणे हे तिला मान्य नाही.

'ही वाट एकटीची' (देवकाठी) या कथेतील सोना शिक्षिका आहे. पण खालच्या समाजातील मुलगी कितीही शिकली सवरली तरीही तिला अपमानाचे जीवन जगावे लागते. गरीब घरातील शिकलेल्या मुलीला पुढे नेण्यापेक्षा तिला मागे खेचण्याचा प्रयत्न अधिक असतो. समाजातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या पुरुषांची मते, खालच्या वर्गातील मुलींविषयी चांगली नसतात. याचा अनुभव सोनाला आला होता. गोंधळी समाजातील सोना शिकते, नोकरी करते; पण तिच्या मनासारखे एकही स्थळ तिच्या जातीत सापडत नाही आणि जातीबाहेर जाऊन तिला लग्न करता येत नाही. फौजदार मुलगा सांगून येतो ; तर त्याच्याविषयी निनावी पत्र येते की,त्याने स्वत:च्या बायकोला मारले. त्यामुळे अशा माणसाशी लग्न करण्यापेक्षा सोना आत्महत्या करते. गरीब व खालच्या वर्गातील स्त्रियांची होणारी कुचंबणा येथे दाखविली आहे.

'मोठ्या बाई' (देवकाठी) मधील सुलोचनाबाई शिक्षण घेतात. नोकरी करतात. घराची सर्व जबाबदारी समर्थपणे पेलतात. लहान भावंडांची शिक्षणे पूर्ण करतात. त्यांची लग्ने लावून देतात. घरच्या जबाबदारीत त्या इतक्या गुरफटून जातात की स्वत: लग्नही करत नाहीत. शेवटी एकाकीपणाचे जीवन त्यांच्या वाट्याला येते.

'मृगया' (कर्कोटक) या कथेतील आनंदीची मुलगी केशर हिला भारतीय प्रथा पाळणे आवडत नाही. त्यात भारतीय लग्न जुळविण्याची

पद्धती तिला रानटीपणाची वाटते. कारण त्यात मुलाला स्वातंत्र्य नाही. मुलगी दाखविण्याचा प्रकार हा एक भयंकर प्रकार आहे. त्यात मुलीच्या भावभावना कोणीच लक्षात घेत नाहीत.

**पारंपरिक मूल्य जपणाऱ्या स्त्रिया-**

'वाळवण' (देवकाठी) कथेतील रमाबाई ही नवरा म्हणजे देव मानणारी आहे. नवरा आळशी, चैनीखोर असूनही त्याचे सर्व लाड ती पुरविते. तिचा नवरा (नाना) हा स्वार्थी आहे. तिच्या मनाचा जराही तो विचार करत नाही. बँकेत अफरातफर करतो. जेलमध्ये जातो. तरीही रमाबाई त्याला सोडविण्यासाठी जिवाचे रान करते. नवरा जेलमध्ये आहे. त्याला कोणत्याही प्रकारच्या सुखसोई नाहीत. म्हणून आपणही त्या सुखसोई घेण्याचे टाळते. गोडधोड खात नाही. नवऱ्यावर प्रेम करणाऱ्या भारतीय स्त्रीचे चित्रण या कथेत येते. 'गणराय रंगी नाचतो' (बिल्वपत्र) या कथेतील अनया अमेरिकेत राहूनही भारतीय संस्कृतीची जपणूक करताना दिसते. मुलांनीही संस्कृतीची जपणूक करावी असा तिचा हट्ट असतो. 'मृगया' (कर्कोटक) या कथेतील आनंदी भारतीय संस्कृतीला श्रेष्ठ मानते. आनंदीची मुलगी केशर हिलाही भारतीय संस्कृतीबद्दल नेहमी ती सांगते. भारतातच केशरचे लग्न लावून देण्याचा ती विचार करते. केशर मोठी झाल्यावर तिला असुरक्षितता जाणवते. भारतात मुलगी मोठी झाली म्हटले की, तिच्यावर लक्ष ठेवायला, संस्कार करायला घरातील इतर मंडळी असतात. पण अमेरिकेत तसे नाही. याची खंत आनंदीला वाटते. आपल्या परीने ती भारतीय संस्कृती जपण्याचा प्रयत्न करते.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

३) अनंत मनोहरांच्या कथेतील स्त्रिया संकटावर मात करणाऱ्या, खंबीर व विवेकबुद्धीने विचार करणाऱ्या आहेत.

स्त्रियांना दुर्बल समजून त्यांच्यावर अधिकार गाजविणाऱ्या पुरुषांना धडा शिकविणाऱ्या खंबीर स्त्रिया त्यांच्या कथेत भेटतात. तसेच परिस्थिती नसताना, घरातून वडलांचा विरोध असताना अडचणीतून शिक्षण घेणाऱ्या स्वाभिमानी स्त्रियाही त्यांच्या कथेत भेटतात.

'मोठ्या बाई' (देवकाठी) या कथेतील सुलोचनाबाई परिस्थिती नसताना कष्टातून शिक्षण घेतात. घरातून वडलांचा विरोध पत्करून त्यांनी स्वत:च्या हिंमतीवर शिक्षण घेतले. नोकरी करत उरलेले शिक्षण पूर्ण केले. घरातील लहान भावंडांची शिक्षणे पूर्ण केलीत. घरची सर्व जबाबदारी सांभाळली. सुलोचनाबाईंचा मित्र रवी याचे सुलोचना बाईंवर प्रेम असूनही त्यांनी कधीही त्याच्याकडे लक्ष दिले नाही. बाई दिसायला वाईट नव्हत्या. रंग गोरा नव्हता तर सावळा होता. डोळे मोठे पाणीदार. सुलोचना नाव कसे साजून दिसत होते. बाईंच्याबद्दल रवी म्हणतो की, "सुलू, तू हसलीस की अतिशय सुरेख दिसतेस. अलीबाबाची गुहा उघडल्यावर रत्नं दिसावीत तसं. तुझं आंतरिक सौंदर्य खुलतं.. ....... .. .. .", "तुला काळी म्हणणारे आंधळे आहेत, हे तुझं तरतरीत नाक, झळाळी असणारा सावळा रंग 'It gives me creeps'[१] रवी म्हणजे बाईच्या जीवनातील भूतकाळातील ओलावा होता. त्या रवीकडे त्यांनी पाठ फिरविली होती. शाळेतील शिक्षिका मीना हिचे प्रेमप्रकरण समजताच त्यांना रवीची आठवण होते. मीनाला त्या समजावून सांगतात. लग्नाला फक्त दोन महिने राहिले असताना लोकांच्या नजरेला येईल असं वागू

नकोस, असे प्रेमाने त्या सांगतात. यावरून त्यांच्या ठिकाणी असलेला समजूतदारपणा दिसतो. सदसद्‌विवेक बुद्धीने विचार करणाऱ्या सुलोचनाबाई यांचे व्यक्तिचित्रण या कथेत आले आहे. ते मोठे उठावदार दिसते. लग्न न करण्यामुळे त्यांचे वेगळेपणही जाणवते.

'राँग नंबर' (बिल्वपत्र) मधील गौरी शहा एक कर्तबगार वकिल आहे. तिच्या व्यक्तिमत्त्वात धारधारपणा दिसतो. तिच्या भाषणात, वागण्यात, बोलण्यात आक्रमकता दिसून येते. स्त्रीरूपी अहंकार आणि स्त्रीची परवशता याबद्दल तिच्या मनात चीड आहे. स्त्रीमुक्ती हा शब्दही न उच्चारता जेथे शक्य असेल तेथे ती आचरण करून दाखवत होती. गौरीच्या भूतकालीन जीवनात एक शोकांतिका घडली होती. गौरीची इच्छा नसताना लग्न लावून दिले जाते. तिच्या नवऱ्याचे घर श्रीमंत होते. पण नवरा बिनकामी, व्यसनी होता. चैनी करायचा. गौरीला मारहाण करायचा. तरीही गौरी त्याच्याजवळ ५ वर्षे राहते. तरीही तिच्या नशिबी हेटाळणीच येते. गौरी त्यावेळीच सासरचे तोंड बघायचे नाही असा निश्चय करते. एम. एस. विद्यापीठातून ती बी. ए. करते. विद्यापीठात पहिली येते. लॉ करते आणि तिच्या हातात सनद येताच नवऱ्यावर दावा ठोकते. स्वत: दावा जिंकते. अशा परिस्थितीवर मात करणारी, खंबीर व विवेक बुद्धीने विचार करून वागणारी सक्षम स्त्री (गौरी) चे चित्रण या कथेत केले आहे. यातून समाजातील स्त्रियांची बदलती मानसिकता जाणवते.

'लाट' (कर्कोटक) या कथेत जानकीचे व्यक्तिचित्रण आले आहे. "जानकी ही कंपनीत व्ही.आय.पी.होती. मुख्य म्हणजे ती सेल्फमेड

होती. स्वत:ला उत्तमरित्या काम करता आले पाहिजे असा तिचा नेहमी हट्ट होता. तिला खोटे बोललेले आवडत नव्हते."[२]. "जानकी दिसायला किंचित उभट चेहरा असणारी, डाव्या नाकपुडीत हिऱ्यांची चमकी, कानांत हिऱ्याच्या कुड्या होत्या."[३]. जानकी ऑफिसमध्ये कडक वागत होती. ती जानकी घरी आल्यावर वेगळी वाटते. जानकी या खंबीर स्त्रीचे चित्रण या कथेत आले आहे.

याच कथेतील अजिता सिंग या मुलीचे व्यक्तिचित्रण महत्त्वाचे आहे. "ती पुण्यातील प्रसिद्ध कॉलेजमधून पास झालेली इंजिनिअर मुलगी आहे. पुण्यात आली त्यावेळी तिला मराठी बोलता येत नव्हते. कामचलाऊ थोडे थोडे मराठी बोलते. अजिता हुशार व तडफदार आहे." हॉस्टेलवर राहून शिक्षण घेतल्यामुळे तिला दुनियादारी चांगलीच माहीत आहे. एकाला दोन हात करण्याची तयारी अजिताकडे आहे". कोणी अतिप्रसंग करायला लागला तर कानाखाली आवाज काढण्याची तयारी असणारी अजिता या कथेत भेटते.

'मनोमनीची अबोल वेडी' (कर्कोटक) या कथेतील दमयंती रसिक आहे. तिला चित्रकलेची आवड होती. म्हणून तिने जे. जे. आर्ट्सला ॲडमिशन घेतले. तिचे वडील वारल्यावर मात्र ती कुटुंबाची जबाबदारी उचलते. टेलिफोन ऑपरेटर म्हणून नोकरी करते. दोन बहीण, भाऊ, आईचा सांभाळ करते. विजयवर प्रेम असूनही त्याला ती कधी बोलून दाखवत नाही. त्याच्या आवडी-निवडी दमयंतीला माहीत होत्या. विजयवर ती मनापासून प्रेम करत होती. वडील वारल्यावर खंबीरपणे स्वत:च्या पायावर उभी राहून आपल्या सर्व घरच्या मंडळींचे

पालनपोषण करणारी स्त्री येथे भेटते. या सर्व कथांतून स्त्री-मन कसे असते हे दाखविण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

४) अनंत मनोहरांच्या कथेतील स्त्रिया संयमी आहेत.

'तर ही डोरिथी' (देवकाठी) या कथेतील डोरिथी "गोड, लाघवी आहे. तिच्या आवडी-निवडींमध्ये कधीही भडकपणा दिसत नाही. ती जवळून गेली तरी स्नो, फेस पावडर आणि सेंटचा मंद सुवास येत असे. तिच्या बोटाची नखे, नेलपॉलिशची करामत पाहण्यासारखी होती. तिचा शिष्टाचार कधीही चुकायचा नाही. क्लाएंट कितीही हटवादी असला तरी तिच्या स्वरातील गोडवा कमी होत नव्हता."[४]. डोरिथी वेदवर प्रेम करत असूनही ती कधीही त्याला बोलली नव्हती. वेद तिला महाबळेश्वरला घेऊन जातो. तेव्हा त्याच्या लक्षात येते. या कथेत कोठेही मादकता येत नाही. संयमी स्त्रीचे चित्रण रेखाटले आहे. तिच्या बोलण्यात,वागण्यात उथळपणा जाणवत नाही. अनंत मनोहरांची स्त्रीपात्रे, संयमी आणि प्रौढ, विचारशील, कुटुंबवत्सल आहेत.

'भेट' (कर्कोटक) या कथेतील लीला २५ वर्षांनंतर तिच्या मित्राला रवीला भेटते. त्यावेळी त्यांच्या एकमेकांबद्दल सात्त्विक प्रेम असते. रवी लीलाची चौकशी करतो. त्यावेळी ती सर्व काही ठीक आहे, सुखी संसार आहे, असे खोटे सांगते. पण प्रत्यक्षात तिच्या पाठीमागे दु:ख हात धुवून लागले होते. नवरा मेला होता. नवरा होता तोपर्यंत सर्व संपत्ती त्याने उधळली. एका मुलीचे लग्न लावून दिले होते. तरीही ती एका शब्दाने रवीला सांगत नाही. रवीची लग्ने असफल ठरली म्हणून ती म्हणते, एखादी चांगली पोरगी बघून लग्न कर. रवी व लीला यांचे २५

वर्षांनंतरही प्रेम कमी होत नाही. लीला ही संयमी आहे आणि विचारी आहे. प्रेमापेक्षा ती आपल्या कुटुंबाचा विचार करते.

'मनोमनीची अबोल वेडी' (कर्कोटक) या कथेतील दमयंती विजयवर लहानपणापासून प्रेम करते. विजयला आवडणाऱ्या सर्व गोष्टींकडे तिचे लक्ष असते. विजयच्या आवडी-निवडी जपते. पण विजयला आपले प्रेम असल्याचे ती कधीही सांगत नाही. दमयंतीचे वडील वारल्यावर कुटुंबाचा सगळा भार उचलते. लहान बहीणीचे लग्न लावून देते. पण स्वत: लग्न करत नाही. विजयच्या लक्षात येईपर्यंत ती काही बोलत नाही .अशी संयमी दमयंती ह्या कथेत भेटते. 'सूर्यमुखी' (कर्कोटक) वेंकटवर मनोमन प्रेम करणारी द्राक्षायणी या कथेत भेटते. द्राक्षायणीचे वडील सावकार होते. "इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरचा डिप्लोमा तिने केला होता. वय तेवीस, सावळी, तरतरीत असणारी द्राक्षायणी या कथेत भेटते."[५].

५) अनंत मनोहरांच्या कथेत भारतीय स्त्रियांबरोबरच परदेशी स्त्रियांची वर्णन आली आहेत.

अमेरिकेमध्ये राहणाऱ्या, मुक्त वागणाऱ्या स्त्रियांचे चित्रण या कथांमधून झाले आहे. 'रक्त' (कर्कोटक) या कथेतील रोझी. भारतीय मेननबरोबर लग्न करते. मेननने रोझीबरोबर तीन वर्षापूर्वी लग्न केले होते. पण नंतर नंतर रोझीचे बेफिकिर राहणे त्याला आवडत नाही. रोझीचे भारतीयांबद्दल कडवट मत होते. 'नो मोअर ब्लॅकीन ऑर ब्राऊनीज इन दि फॅमिली' असे ती मेननला म्हणते. रोझी मेननच्या भाषेला 'जॅबरिंग इन मंकी डायलेक्ट' असे म्हणते. भारतीय लिपी तिला

मंकी स्क्रिप्ट वाटत होती. मेननचे वडील येणार समजताच ती घर सोडून जाते. जाताना एक पत्र व किल्ल्या ठेवून जाते.येथे फक्त व्यवहार दिसतो. परकीय संस्कृतीची झलक येथे दिसते. याच कथेत मेननचा मित्र नायर हा न्यूयॉर्कमध्ये राहतो. त्याची पत्नी सुब्बलक्ष्मी ही भारतीय आहे. सुब्बीचा व नायरचा संसार सुखाचा होतो. सुब्बलक्ष्मी गृहिणी म्हणून उत्कृष्ट आहे. न्यूयॉर्कमध्ये राहूनही तिने भारतीयत्व टिकविले होते. "सुब्बीही नायरची प्रेयसी, वात्सल्य असलेली माताही होती. सुब्बीला गंधाचे वेड होते. तिला अमेरिकत फुलांना वास नाही याचा फार राग येई."[६]. 'केशर कस्तुरी देणारा देश आहे माझा' असे ती भारताबद्दल अभिमानाने सांगत असे.

'पेगी' (कर्कोटक) या कथेतील पेगी ''सोनेरी केस, चटई वेणी घातलेली, चौकड्यांचा स्कर्ट, त्यावर पांढरा शुभ्र टॉप, निळे डोळे, लालचुटक ओठ, अंगासरसा बांधा, साडेपाच फुटाच्या आसपास उंची, पातळ नाकपुड्या, धरधरीत सरळनाक, नितळ अंग, लाल गोरी.''[७] एक अमेरिकन मुलगी. पेगीच्या आईने घटस्फोट घेतला ;त्यामुळे तिला वर्षातून दोन वेळा वडलांना भेटायला मिळत होते. तिला वडलांसारखे वकिल व्हायचे होते. आईने दुसरे लग्न केले. सावत्र बापाचा हुकूमशाही स्वभाव तिला आवडत नव्हता. म्हणून त्याच्याशी वाद होऊन ती घराबाहेर पडली होती. घर सोडून नोकरी करून शिक्षण घेणारी स्वाभिमानी पेगी या कथेत भेटते. पेगीचा बॉयफ्रेंड हा स्वार्थी आहे आणि तिच्या सर्व वस्तू स्वत:च्या समजतो आहे हे लक्षात येताच तिने त्याला लाथ मारून बाहेर काढले. अशी तडफदार पेगी या कथेत भेटते. या कथेतून

सुशिक्षितांच्या मानसिकतेत झालेला बदल दिसून येतो.

'डेड एन्ड'(कर्कोटक) या कथेतील जॅकची पत्नी मिली ही पाश्चात्त्य देशातील आहे. जॅकबरोबर पटत नाही म्हणून ती लगेचच त्याच्याशी संबंध तोडून टाकते. लॅरिसा ही जॅकची नवीन मैत्रीण आहे. ''तिचे कुरळे केस, मोठे डोळे, काळेभोर, चमकदार शुभ्रदात. काळा पण सतेज वर्ण उंच आणि सडपातळ देह, हसतमुख चेहरा.''[८] जॅकला खेळत असताना प्रोत्साहन देतो ;त्यामुळे तो सामना जिंकतो.

## ६) सौंदर्य स्पर्धेत भाग घेऊन जीवन उद्ध्वस्त झालेल्या स्त्रियांचे व्यक्तिचित्रण

'धुके' (देवकाठी) या कथेतील सुसान दिसायला सुंदर होती. दहावीला चांगले मार्क्स असतानाही ती सायन्सला न जाता जे- जे आर्ट्सला ॲडमिशन घेते. तिला चित्रकलेची विशेष आवड होती. कलासक्त असणारी सुसान सौंदर्यस्पर्धेत भाग घेते आणि त्याच विश्वात गुरफटून जाते. शिक्षण सोडते. मायदेश सोडते. अमेरिकेत जाऊन आई-वडलांना, मायकेलला (मित्र) विसरते. त्यांच्या पत्रांना उत्तरे देत नाही. तिची प्रसिद्धीची धुंदी उतरायला थोडा वेळ लागला. सौंदर्य ही टिकणारी गोष्ट नाही. हे लक्षात यायला उशीर झाला होता. सौंदर्याच्या फसव्या कीर्तीला बळी पडल्याचे दु:ख तिला होत होते तिच्या जीवनाची वाट धुक्यात हरविल्यासारखी तिला वाटत होती. आई-वडलांची पर्वा न करता घराच्या बाहेर पडलेली सुसान या कथेत भेटते. मायकेलला आपण गौण समजले याचा तिला पश्चात्ताप होतो. ती मुक्तकंठाने रडू लागते.

स्वत:च्या हाताने स्वत:चे वाटोळे करून घेतले हे तिच्या लक्षात येते आणि सौंदर्य स्पर्धेतील फसवेगिरीही लक्षात येते.

'चेहरा' (बिल्वपत्र) या कथेतील ग्लोरिया ही मध्यमवर्गातील मुलगी. सौंदर्य स्पर्धेत भाग घेते. स्पर्धा जिंकते. तिला गावात राहणे आवडेनासे झाले. शहरातील झगमगाट तिला आकर्षित करू लागला. आईला गावात ठेवून ती न्यूयॉर्कला जाते. तेथे तिच्यावर वाईट प्रसंग येतात. "तिच्या डाव्या गालावर, पाठीवर, कुशीवर सुऱ्याच्या जखमा झाल्या होत्या. त्यामुळे तिला जाहिरातही मिळत नव्हता." तेथे चेहरा हे भांडवल असते. तोच जर खराब झाला तर काहीच किंमत राहत नाही. ग्लोरिया या प्रवाहाच्या बाहेर फेकली जाते. अशा मुली मिळेल ती नोकरी करतात. नाहीतर रस्त्यावर येतात. ग्लोरिया गहाणवटीचा धंदा करणाऱ्या म्हाताऱ्याकडे नोकरी करते. नंतर ती न्यूयॉर्क सोडून मियामीकडे जाते. तेथे वॅफल हाऊस काढते.

प्रसिद्धीच्या मागे लागून स्वत:च्या जीवनाचे वाळवंट करून घेणारी ग्लोरिया या कथेत भेटते. अशाप्रकारे स्त्रियांच्या जीवनातील काही वेगळ्या पण महत्त्वाच्या समस्यांचे चित्रण लेखकाने वास्तववादी दृष्टिकोनातून केले आहे. येथे एक वेगळाच प्रश्न हाताळलेला दिसतो. हेच अनंत मनोहरांच्या कथांचे वैशिष्ट्य होय.

### ७) स्त्रियांच्या मानसिक कोंडमाऱ्याचे चित्रण

'पडदा' , 'दास' (देवकाठी) या कथांतील स्त्रियांचे चित्रण लेखकाने समर्थपणे केले आहे. 'अंमला' व 'विजू' ह्या मध्यमवर्गीय

स्त्रिया आहेत. चाळीतील जीवन जगताना येणाऱ्या समस्या, त्या समस्यांवर मात करण्याच्या चढाओढीत त्यांचा स्वत:चा भावनिक व मानसिक कोंडमारा होत असतो.

'पडदा' या कथेतील अंमला ही शिक्षिका आहे. सरळसरळ संसारी प्रवृत्तीची, नाकासमोर चालणारी, पाय धरणीला घट्ट चिकटलेली. ही अंमला राजेंद्रबरोबर संसार करते. राजेंद्र नाटकात काम करतो. त्या नाटकात बल्लाळाच्या भूमिकेसाठी घातलेला ड्रेस, त्यात राजेंद्र छान दिसतो. राजेंद्रला असाच ड्रेस शिवायचा असा अंमला विचार करते.'दास' कथेतील विजूला चाळीत राहताना त्रास होत असतो. एकत्र कुटुंबपद्धती, अपुरी जागा यामुळे विजूचा भावनिक, मानसिक कोंडमारा होताना दिसतो. धाकट्या दिरांना केव्हातरी सरकारी खोली मिळेल व ते दुसरीकडे राहयला जातील व त्यामुळे आपणास मोकळीक मिळेल या विश्वासावर ती येथे राहिलेली असते.

'अखेरची भूमिका' (देवकाठी) या कथेतील शरयू हिला फसविणारा देवदत्त ज्यावेळी तिची जबाबदारी नाकारतो त्यावेळी शरयूची मानसिकता कशी असते याचे चित्रण या कथेत येते. शरयू देवदत्तला धडा शिकविते.

'ही वाट एकटीची' (देवकाठी) या कथेतील सोना शिक्षिका आहे. पण तिच्या जातीत सोनाइतका शिकलेला मुलगा मिळत नाही आणि जातीच्या बाहेर जाऊन लग्न करता येत नाही. सोनाला यात भावनिक कोंडमारा सहन करावा लागतो. समाजात बिनलग्नाचे राहता येत नाही. समाजातील माणसे वाटेल तसे बोलतात. फौजदाराचे स्थळ आल्यावर

ती लग्नाचा विचार करते ; पण निनावीपत्र आल्यावर मात्र ती अस्वस्थ होते. फौजदाराने त्याच्या पहिल्या पत्नीचा छळ करून तिला मारली हे वाचताच तिची मानसिकता वेगळी बनते. अशा माणसाशी लग्न करण्यापेक्षा ती आत्महत्त्या करते. यातून तिचा होणारा मानसिक कोंडमारा लेखकाने दाखवून दिला आहे.

अनंत मनोहरांनी केलेल्या कथालेखनात काही ठळक व्यक्तिचित्रणे आली आहेत. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बदलांचा परिणाम समाजावर व पर्यायाने सर्वांवर होताना दिसतो. आर्थिकतेमुळे मानसिक कुचंबणा येते. अनंत मनोहरांच्या कथेतील येणारी पुरुष व्यक्तिचित्रणे परिस्थितीवर मात करणारी आहेत. त्यांच्या कथेतील पुरुष उच्चशिक्षित आहेतच ; पण अशिक्षित समजल्या जाणाऱ्या व्यक्तींचेही ते चित्रण करतात. त्याच्या कथेतील ठळकपात्रे ही विचार करणारी आहेत. सदसद्‌विवेक बुद्धीचा वापर करून सहानुभूतीने जगणारी आहेत. काही कथांत महाबिलंदर व वस्ताद असणारे एकमेकाला फसविणारे स्वार्थी पुरुषही दिसून येतात.

**आ ) पुरुष व्यक्तिचित्रणे-**

'देवकाठी' (देवकाठी) या कथेतील बापू शिंदे हे वयाने व अनुभवाने मोठे आहेत. धार्मिक वृत्तीचे, माणुसकीला महत्त्व देणारे बापू या कथेत भेटतात. बापूंची व योगेश भोंबेची ओळख बसमध्ये होते. बापू शिंदे योगेशबरोबर बोलत असताना त्याला कोणते तरी दु:ख आहे हे त्यांना जाणवत होते. पण विचारू शकत नव्हते. बापू हे वारकरी



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

होते. सरकारी नोकरीत असताना त्यांच्या वडलांनी बापूंच्या गळ्यात माळ घातली. त्यावेळपासून बापूंची वारीला सुरुवात झाली होती. योगेशला दु:ख आहे ते जाणून घेण्याची त्यांची धडपड या कथेत दिसते. योगेशची पत्नी वारली. त्यावेळी त्याची मानसिकता वेगळी होती. योगेशला शहरात करमत नव्हते. म्हणून तो कोकणात निघून आला होता. त्यावेळी बसमध्ये बापूंची ओळख झाली होती. योगेशचे दु:ख जाणून घेतल्यावर बापू त्याला पंढरपूरला जाऊन विठ्ठलाला जाब विचारण्यासाठी वारीत सामील व्हायला सांगतात. विठ्ठलाच्या चरणी विलीन झाल्यावर सर्व दु:खे हरतात. म्हणून वारीत सामील व्हा असे योगेशला सांगतात.

## १) चांगल्या विचारांचे मित्र

'धुके' (देवकाठी) या कथेतील सुसानचा मित्र मायकेल हा चांगल्या विचारांचा आहे. सुसानने दहावीनंतर सायन्सला ॲडमिशन घ्यावी. तिने पुढे शिकावे असे त्याला वाटते; पण सुसान त्याचे ऐकत नाही. जे. जे. आर्ट्सला ॲडमिशन घेते. तेथून सौंदर्य स्पर्धेत भाग घेते. तिला यश मिळत जाते. सुसान घराला व मायकेलला पूर्णपणे विसरते. मायकेल तिला पत्रे पाठवितो. त्याच्या पत्रांना ती उत्तरेदेखील देत नाही. मायकेल एम. एस. करतो. अमेरिकेत नोकरी करतो.

'शर्त' (देवकाठी) या कथेत दोन जिगरी मित्रांची कथा आली आहे. रमेश आगरवाल व डॉ. पंडीत हे दोघेही वेगवेगळ्या फिल्डचे आहेत. रमेश कॉमर्सचा विद्यार्थी आहे; तर पंडीत सायन्सचा. या दोघांची

ओळख वक्तृत्व स्पर्धेत होते. शिवाय रमेश श्रीमंत घरातील, पंडीत मध्यमवर्गीय घरातील तरीही रमेश डॉ. पंडीतकडे चाळीत येत होता. एक दिवस रमेश पंडीत च्या घरी आला. त्यावेळी तो उदास होता. त्याला पंडीत विचारतो, त्यावेळी विदेशा प्रधानबद्दल माहिती मिळते. डॉ. पंडीतांच्या रक्तदान शिबिरच्या कॅम्पच्यावेळी विदेशा डॉ. पंडीतांना भेटते. त्यावेळी पंडीत रमेश अग्रवालची ओळख सांगतो. नंतर विदेशा गायकवाडच्या मुलाच्या लग्नात भेटते. त्यावेळी विदेशाचा लहरी स्वभाव पंडीतच्या लक्षात येतो. त्यावेळी पंडीत रमेशला सांगतात, " तू काही विदेशाची भेट घेऊ नकोस, भेट घेतलीस तर तिच्याबरोबर जास्त बोलू नकोस. तिच्यापासून काहीतरी लपवित आहोत असे दाखव." विदेशा परत भेटल्यावर कशी काय झाली परवाची सहल असे विचारतो. त्यावेळी तिच्या काहीच लक्षात येत नाही. रमेश आजारी असल्याचे व त्याचे आई-वडील गावाला गेल्याची थाप डॉ. पंडीत मारतात. त्यावेळी बेचैन होऊन विदेशा रमेशला फोन करते. रमेश खुश होतो.

रमेशला त्याची प्रेयसी मिळून देणारा मित्र या कथेत भेटतो.

'बिल्वपत्र' (बिल्वपत्र) या कथेतील गणेशचा मित्र दिगंबर याचे चित्रण आले आहे. गणेश आणि दिगंबर एका शाळेत शिकत होती. गणेश व दिगंबर हुशार विद्यार्थी होते. एका- दोन गुणात त्यांच्यात चढाओढ असते ; तरीही ते एकमेकांचे चांगले मित्र होते. दिगंबर याच्या घरी मठाचा मठाधिपतीचा मान असल्याकारणाने त्याने पुढे शिकण्यापेक्षा ज्योतिष विद्या शिकावी असा आबा महाराजांचा (वडलांचा) हट्ट होता. दिगंबरला गणेशने पुढे शिकावे, मोठे व्हावे असे वाटते. दिगंबर

कोकणात गेल्यावरही ते एकमेकांना पत्र पाठवून खुशाली कळवत होते. गणेशला वडलांचा विरोध असूनही संस्कृतमधून एम.ए. करतो. पीएच. डी. करणार हे ऐकून दिगंबरला आनंद होतो. दिगंबर गणेशला पुढे शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देत होता. गणेशचे वडील हट्टाने गणेशच्या इच्छा, अपेक्षा पायाखाली तुडवून त्याला मठाधिपती होण्यास भाग पाडतात. त्यावेळी दिगंबरला वाईट वाटते. आपल्या मित्राच्या इच्छा अपेक्षांचा खून करणाऱ्या आबा महाराजांविषयी त्याच्या मनात चीड निर्माण होताना दिसते.

'चेहरा' (बिल्वपत्र) या कथेतील ग्लोरियाचा मित्र पॉल ग्लोरियाला सौंदर्यस्पर्धेत भाग घेतल्यावरही तितकाच जीव लावतो. ग्लोरिया, सौंदर्यस्पर्धेत जाऊन शहराच्या झगमगाटीलाच भुलली असताना तो तिला समजविण्याचा प्रयत्न करतो. तिच्या उंचावलेल्या अपेक्षा त्यांना आळा घालण्याचा प्रयत्न करतो. पण ती त्याचे ऐकत नाही. आईला सोडून ती न्यूयॉर्कला जाते. ग्लोरियाच्या आईने पॉलला जमीन कसायला दिली होती. तो जमीन कसतो ; पण त्यातील ग्लोरियाचा हिस्सा बाजूला काढून ठेवतो. ग्लोरिया आल्यावर ते पैसे व तिची जमीन तिला परत करणार असतो. ग्लोरिया ज्यावेळी त्याला भेटते तो तिला तिच्या नावावरचे पैसे व जमीन द्यायला तयार होतो असा माणुसकीला जागणारा पॉल या कथेत भेटतो. ग्लोरियावर आलेली वाईट अवस्था पाहून त्याला दु:ख होते.

'भेट' (कर्कोटक) या कथेतील रवी हा लीलाचा मित्र आहे. २५ वर्षांनंतर भेटल्यावरही लीलाची आपुलकीने चौकशी करतो. लीलाचा संसार चांगला चालला आहे हे ऐकून तो खुश होतो. लीलाला भेटवस्तू

देतो. रवी लीलाची बाहेरून चौकशी करतो. त्यावेळी तिच्या जीवनात काहीच सुख नाही हे कळल्यावर त्याला दु:ख होते, असे दु:खी जीवन जगण्यापेक्षा आपण परत जीवनाची सुरुवात करू शकतो असे त्याला वाटते. रवी हा आधुनिक विचारांचा आहे हे लक्षात येते. रवीचे लीलावर असणारे प्रेम या कथेतून व्यक्त होताना दिसते.

रवी हा उच्चशिक्षित आहे. बाहेरच्या देशात राहून आलेला असल्यामुळे त्याच्या विचारांत आधुनिकता दिसून येते.

### २) स्वार्थी, लबाड, फसविणारे, आपमतलबी पुरुष

'व्यक्ती तितक्या प्रकृती' या न्यायाने वेगवेगळ्या स्वभावांचे चित्रण अनंत मनोहरांच्या कथांमधून होताना दिसते.

'हारजीत' (देवकाठी) या कथेतील धोंडूकाका हे स्वत:च्या पुतण्याला नोकरी सोडून शेती करण्याचा सल्ला देतात. पुतण्याला शेताच्या नावाखाली पैसे उचलण्याचा त्यांचा स्वार्थी स्वभाव याचे चित्रण केले आहे. शेतात खड्डे काढले ; पण ते पावसाने बुजून गेले. अशी खोटी कारणे सांगण्यास ते पुढेमागे बघत नाहीत. पुतण्याला गावाकडे नोकरी सोडून ये सांगणारे धोंडूकाका त्याच्या मुलांना नोकरीसाठी शहरात पाठवतात. धोंडूकाकांच्या घाऱ्या डोळ्यांचे वर्णन करताना लेखक म्हणतो, ''कोकणस्थासारखे घारे डोळे. काकांनी तेवढ्या गलमिशा काढून टाकल्या आणि डोक्याला पटक्याऐवजी टोपी घातली तर ते थेट बर्वे- लेले वाटतील.''[१] 'त्यांचे डोळे मांजरासारखे घारे आहेत.' यावरून दुसऱ्याला फसविणारे धोंडूकाकांचे वर्णन लक्षात येते.

'अखेरची भूमिका' (देवकाठी) या कथेतील देवदत्त हा मुलींना

फसविणारा स्वार्थी माणूस आहे. ''देवदत्त वयाने पस्तीशीच्या पुढे झुकलेला परंतु पंचविशी वाटणारा, मृदुभाषिणी असा देवदत्त या कथेत भेटतो. तो नाट्य दिग्दर्शक आहे. तो निंदेला कधीही घाबरत नाही. त्याने त्याच्या सहवासात आलेल्या अनेक मुलींना फसविले आहे. त्याचा पश्चात्ताप देवदत्तला कधीच होत नाही.''[१०] तर तो त्या मुलींसाठी देवाकडे प्रार्थना करतो. करून - सवरून मी त्यातला नाही असा देवदत्त या कथेत भेटतो. शरयू उपासनेला फसवून तो कीर्ती प्रधान नावाच्या मुलीच्या पाठीमागे लागतो. शरयू त्याला लग्नाबद्दल विचारते. उद्या होणाऱ्या अपत्याबद्दल विचारील त्यावेळी जगाला काय सांगू असा प्रश्न ती करते. तर देवदत्त तिला सरळ म्हणतो, ''माझा काय संबंध ? पितृत्व हे नेहमीच संशयास्पद असतं, शरयू.'' आपली जबाबदारी झटकणारा देवदत्त, मुलींना फसवून आपण त्यातले नाहीत असा भास निर्माण करतो. अशा स्वार्थी, आपमतलबी, फसवणूक करणाऱ्या देवदत्तचे चित्रण या कथेत येते.

'वाळवण' (देवकाठी) या कथेतील रमाबाईचा नवरा नाना हा आळशी व स्वार्थी, आपमतलबी वृत्तीचा आहे. नोकरीला जाऊच नये असे त्याला वाटते. रमाबाई व नाना यांना अपत्य नव्हते ; पण एखाद्या लहान मुलासारखा रमाबाईंनी त्याचे लाड केले होते. नाना चैनी व व्यसनी असल्यामुळे नाना बँकेत अफरातफर करतात. त्यामुळे त्यांना जेलमध्ये जावे लागते. बायकोकडे नानांचे लक्षच नव्हते. जेलमध्ये गेल्यावर तेथील परिस्थितीबद्दल ते बायकोला सांगतात. नानांसारखा स्वार्थी माणूस स्वत:चे सुख पाहतो ; पण बायकोची फरपट पाहत नाही. तिने पुढचे

आयुष्य कसे काढायचे याचा विचार नानांच्या मनात येत नाही.

'बिल्वपत्र' (बिल्वपत्र) या कथेतील आबा महाराज स्वत:च्या स्वार्थापोटी मुलांच्या इच्छेचा बळी द्यायला पुढे मागे पाहत नाहीत. गणेशला एम. ए. झाल्यावर पीएच. डी. करायची आहे. तरीही त्याला आबा महाराज शिकू देत नाहीत. आबा महाराज मठाधिपती होते. त्यांच्यानंतर त्यांच्या मुलांनी त्यांचा मान राखून मठ सांभाळावा अशी त्यांची इच्छा होती. दोन मुले वारल्यावर पर्यायाने गणेशने मठाधिपती व्हावे, आपल्या घराची सत्ता दुसऱ्याकडे जाऊच नये यासाठी ते प्रयत्न करतात. दुसरा मुलगा वारला त्यावेळी गणेशकडून आबा वचन घेतात की, मठ मी सांभाळीन. तेव्हाच त्याच्या प्रेताला हात लावू देतात. तेराव्या दिवशी त्याचा मठाधिपती म्हणून मोठा समारंभ केला जातो. आबांच्या व्यक्तिरेखेचे वर्णन लेखकाने पुढीलप्रमाणे केले आहे : "पावणे सहा फूट उंची, डोळे मोठे लालसर, रंग काळा, देहभक्कम, कमरेला विटका, जुना पितांबर, खांद्यावरून जाड काळे कळकट जानवे, तोंड विडा खाल्ल्यामुळे लाल, नजर उग्र, मादक, त्या नजरेत सदैव कसला तरी हिशेब मनात चालू असल्याचा भाव असे."[११] आबांच्या व्यक्तिमत्त्वात एक गर्विष्ठपणाची झलक होती. त्यांचे बोलणेही मनाला लागेल असेच होते.

'झुंज' (बिल्वपत्र) या कथेतील तुकाराम परब हा मतलबी, स्वार्थी आहे. कामगार संघटनांचा अध्यक्ष आहे. तुकाराम कामगारांना आपल्या भाषणाने मुठीत ठेवण्याचा प्रयत्न करतो. कामगारांच्या समस्या मांडणे हे त्याचे काम होते. तो ज्या कंपनीत काम करत होता त्यात त्याचा वट होता. त्याची सैल नितिमत्ता होती. बोलण्याचे बंधन नव्हते. तुकारामला

त्याच्यामुळे नोकरी गमवावी लागते. त्याच्या या स्वभावामुळे त्याला रेल्वेतून ढकलून दिले जाते.

### ३) परिस्थितीवर मात करण्याची तयारी असणारे पुरुष

'देवकाठी' (देवकाठी) या कथेतील योगेश भोंबे हा गरीब घरातील आहे. "योगेश उंच, सडपातळ, गोरा, घाऱ्या डोळ्यांचा, वयाने चाळिशीच्या आसपास होता. योगेशने गरिबीतून दिवस काढले. नोकरी करत शिक्षण केले. मोठ्या फर्ममध्ये नोकरी केली. पैसा साठवला. गरिबी झिंजाहून टाकली. आयुष्यभर पुरेल इतका पैसा गोळा केला. भारतात आला. स्वतंत्र व्यवसाय सुरू केला."[१२]. क्लाएंट मिळू लागले. बँक ऑफ महाराष्ट्र, सिबा, इंडियन प्लॅस्टिक्स लिमिटेड अशा मोठ्या कंपन्यांचे ऑडिट योगेश पाहत होता. त्याच्या पत्नीने त्याला साथ दिली. पण तिच्या अचानक मृत्यूमुळे त्याला धक्का बसतो. त्याचा जाब विठ्ठलाकडे मागण्यास पंढरपूरला जाण्यास तयार होतो. परिस्थिती नसताना शिक्षण घेऊन नोकरी करून स्वत:च्या पायावर उभा राहणारा योगेश या कथेत भेटतो.

'भूक' (देवकाठी) या कथेतील विनय जोशी गरीब कुटुंबातील आहे. वडील वारल्यावर चुलत्यांनी त्याला व त्याच्या आईला योग्य वागणूक दिली नाही. विनयचा पोरका म्हणून अपमान करतात. शाळा शिकण्यापेक्षा गावात नोकरी कर अशी अपेक्षा चुलते बाळगतात. विनय मुंबईला जाऊन पुढचे शिक्षण घेतो. मुंबईत राहून सकाळी पेपर टाकायचा, दुपारी कॉलेज, संध्याकाळी पुन्हा पेपरचे काम करायचा.

रात्री पानपट्टीवाल्याचे, विडीवाल्यांचे हिशेब लिहून देण्याचे काम करत असे. बिले तपासायची, मजुरी मांडायची. त्या बदल्यात त्याला रात्री दुकानात झोपायला जागा मिळत होती, अशा अडचणींतून विनय सी. ए. होतो. आई वारल्यावरही कोकणात विनय जातो. कारण चुलत्याला मत्सराने हिरवे निळे होताना त्याला पाहयचे आहे.

'आश्रित' (बिल्वपत्र) या कथेतील जयवंत हुशार आहे. वडील जहागीरदाराच्या घरी चाकरी करतात. जहागीरदारांनी त्याच्या शिक्षणासाठी पैसे घातले होते. जहागीरदारांची मुलगी उषा हिचे लग्न होते; पण नवऱ्याबरोबर पटत नाही. तिचा संबंध धनेश देसाईशी आला होता. धनेश देसाईच्या बंगल्यावर छापा टाकण्याचे काम जयवंतकडे येते. तो छापा टाकतो. त्यावेळी त्या बंगल्यावर उषा राजे नव्हत्या; पण त्या पहाटे पहाटे येतात. एकाजागी बसून राहतात. त्यावेळी जयवंतला संशय येतो ; त्या ज्या जागी बसल्या होत्या त्या ठिकाणी महत्त्वाची डायरी होती ; पण उषाराजे जयवंतला त्यांच्या वडलांच्या उपकाराची आठवण करून देतात. गळ्यातील पाऊण लाखाचा हार देतात. घरी गेल्यावर जयवंतला अस्वस्थ वाटते. तो उषाला फोन करून हार मागे घेण्याची विनंती करतो. हार स्वीकारला तर आपण अजून आश्रित व गरजू आहोत असे वाटते. जयवंतचे वडील ताठ मानेने जगले नाहीत ; पण आपण त्यांचा वारसा घ्यायला नको असा त्याचा स्वभाव आहे. उषा राजेच्या वडलांनी शिक्षणात मदत केली. त्याचा ते आदर राखतात. तो हार स्वीकारत नाही.

## ४) राजकारणी लोकांची व्यक्तिचित्रणे

'वंशज' (देवकाठी) या कथेतील सर्जेराव पाटील यांचे वृत्तपत्र 'जनसेवक' हे आहे. प्रतापराव त्याचे संपादक आहेत. हे प्रतापराव तडफदार, सरळसरळ आरोप करण्यास घाबरत नाहीत. त्यांनी लिहिलेला लेख नागोजी कावळे पाटील यांच्या विरोधात आहे. हे समजताच सर्जेराव पाटील पुरावा मागतात. नागोजी कावळे पाटील शिक्षकांच्या सह्या घेऊन थोडाच पगार त्यांच्या हातावर ठेवत होते. हा प्रकार जनतेपुढे आणण्याच्या प्रतापरावांच्या प्रयत्नाला मुरड घालण्याचा प्रयत्न करतात. कारण सर्जेराव पाटीलांना आमदारकीचे तिकिट हवे होते. प्रतापरावांना त्याच्याबद्दल काहीच माहीत नव्हते. त्यांनाच सर्व वेड्यात काढतात. अशा भ्रष्ट राजकारण्याचे चित्रण या कथेत आले आहे.

'एका प्रशिक्षणाची कहाणी' या कथेतील रशीद आय. आय. टी. प्रवेश परीक्षेत २५ वा येतो. त्याच दरम्यान बिहारचे कीर्तिचंद्र झा हे शिक्षणमंत्री झाले होते. त्यावेळी रशीदने त्यांचे भाषण ऐकले. त्यावेळी रशीद आय. ए. एस. होण्याचे ठरवितो. कीर्तिचंद्र झा यांचा मुलगा आर. आर. झा. हे राजकारणात आले होते. त्यांनी गुंडगिरी करून लोकांना धमकावून जागा लाटण्यास सुरुवात केली. रशीद आय.ए.एस. झाल्यावर त्याच्याकडे त्याची काही प्रकरणे आली ; पण रशीद लाच देऊनही वठणीवर येत नाही म्हटल्यावर आर. आर. झा हे रशीदलाच फसवितात. रशीदवरच अब्रुनुकसानीचा खोटा खटला भरण्याची धमकी देतो. रशीदला सही करा; नाहीतर नोटीस घ्या असे दोन मार्ग दाखवतात ; पण रशीद सरळ नोकरीचा राजीनामा देतो. राजकारणी माणसाकडून

फक्त आश्वासने मिळतात हे लक्षात येते.

'एका आवाहनाची फलश्रुती' (कर्कोटक) या कथेत ही पंकज गांगल हे अमेरिकेतील डॉक्टर होते. गेंडासिंगाचे भाषण ऐकून ते विचार करतात की, आपल्या भारताला आपल्यासारख्या लोकांची गरज आहे. म्हणून ते नोकरी सोडून भारतात यायला तयार आहेत. पण त्यांना भारतातून चांगला प्रतिसाद मिळत नाही. गेंडासिंगच्या सांगण्यावरून पंकज भारतात फोन करतो, पत्रव्यवहार करतो; पण त्याला प्रतिसाद मिळत नाही.

'मुकूट' (कर्कोटक) या कथेतील बाजीराव हे सी. एम. होण्याचे स्वप्न बाळगतात ; पण ते पूर्ण होत नाही. त्यांनी त्यांचे जीवन काँग्रेसला वाहून घेतले होते. गांधींच्याबरोबर चळवळीत ते होते. पक्षनिष्ठा असूनही त्यांचा विचार केला जात नाही. त्यामुळे बाजीराव नाराज होतात. राजकारणापेक्षा घरातील अडचणींकडे ते लक्ष देतात. त्या सोडविण्याचा प्रयत्न करतात. त्यांना अचानक सी. एम. चा फोन येतो. उपमंत्री म्हणून मंत्रिमंडळात बाजीरावाचे नाव येते. हे ऐकून त्यांचे शरीर पिसाप्रमाणे हलके होते.

## ५) विद्रोही व्यक्तिमत्त्व

'जर्म' (कर्कोटक) या कथेत सत्यव्रत साठे या नवबौद्धाचे ठळक व्यक्तिचित्रण आले आहे. हा सत्यव्रत वकिलीचा अभ्यास करणारा आहे. त्याचे एक अभ्यास मंडळ आहे. तो कामगार पुढारी आहे. अँग्री यंग


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मॅनच्या प्रतिमेतला सत्यव्रत या कथेत पाहवयास मिळतो. जे जे प्रस्थापित आहेत त्यांच्यावर कोसळून पडणारा, कोणत्याही भाषणाची चीड येणारा, स्पृश्यांचे जीवन, धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृती, कला, निष्ठा यावर टीकेचे आसूड ओढणारा, तापलेले मस्तक, धगधगणारे मन, तीव्र प्रतिक्रिया, स्फोटक वृत्ती, मनस्वी, आग्रही, रफ अॅन्ड रॉ असा सत्यव्रत या कथेत भेटतो.''[१३].

आंबेडकर, फुले, शाहू यांच्या तत्त्वांना प्रमाण मानणारा एक जागृत लेखक आहे. आसाममध्ये जमीनदार अमानुषतेची कथा 'मूठभर मातीचे गाणे' ही लिहिली. यावर समाजातील बारीक घडामोडींकडे त्यांचे लक्ष असल्याचे दिसते असे विद्रोही व्यक्तिमत्त्व पाहवयास मिळते.

## समारोप

व्यक्तीला स्वतंत्र अर्थ असतोच असे नाही. त्याचे व्यक्तिमत्त्व साकार होते ते समाजामुळेच. समाजाचा एक घटक म्हणून व्यक्तीकडे पाहिले जाते. समाजातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्तराचा प्रभाव व्यक्तीवर पडतो. समाजाशिवाय व्यक्ती ही गौणच असते. स्वत:ला कितीही स्वतंत्रपणे वागण्याची इच्छा असली तरी व्यक्ती तशी वागू शकत नाही. कारण त्या व्यक्तीवर सामाजिक बंधने असतात.

प्रस्तुत संग्रहात अनेक व्यक्ती भेटतात. त्यांचा सामाजिक स्तर वेगवेगळा आहे. वेगवेगळ्या समाजातील व्यक्ती येथे आल्या आहेत. सर्वसाधारणपणे या संग्रहात भेटणाऱ्या व्यक्ती सर्वसामान्य आहेत तर

काही उच्च विभूषित, परदेशात राहणाऱ्या आहेत. यावरून लेखकांचा स्तर लक्षात येतो. लेखकाला दररोजच्या जीवनात भेटलेल्या, स्मरणात राहून गेलेल्या व्यक्ती येथे साकार झाल्या आहेत. यावरून लेखकाचा सामाजिक स्तर निश्चित होतो.

अनंत मनोहरांच्या कथांतील स्त्रिया ह्या समाजातील प्रथा, रूढींना विरोध करून स्वत:चे एक वेगळे व्यक्तिमत्त्व बनविण्याचा प्रयत्न करतात. त्याच्या कथांतील स्त्रिया रडत बसणाऱ्या किंवा दुसऱ्याला दोष देणाऱ्या नाहीत तर त्या नव्या हिंमतीने परत उभ्या राहतात. भारतीय संस्कृती उच्च आहे म्हणून त्या संस्कृतीची जपणूक करणाऱ्या स्त्रियांचे व्यक्तिचित्रण कथेत करतात. 'देवकाठी', 'बिल्वपत्र' आणि 'कर्कोटक' या तिन्ही कथा संग्रहांतील स्त्रिया रसिक आहेत. तशाच त्या संयमी व विवेकबुद्धीने वागणाऱ्या स्त्रीचे चित्रण ते उठावदारपणे करतात. मध्यमवर्गीय जीवन जगताना स्त्रियांचा होणारा मानसिक कोंडमारा व त्या परिस्थितीला समजावून घेऊन जिद्दीने संसार करणाऱ्या स्त्रियांचे चित्रण ते करतात.

पुरुष व्यक्तिचित्रणात चांगल्या विचारांचे पुरुष येतात. मैत्रीसाठी वाटेल ते करण्याची त्यांची तयारी असते. समाज म्हटले की, चांगले तसे वाईट हे आलेच. त्याच न्यायाने काही स्वार्थी, लबाड, स्वत:चे पोट भरू पाहणाऱ्या पुरुषांचे व्यक्तिचित्रणही त्यांनी केले आहे. या तिन्ही कथासंग्रहांतील पुरुष बहुधा उच्चशिक्षित आहेत. परदेशात जाऊन शिक्षणे घेतलेली आहेत.

पुरुष परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न करतात. काही

राजकारणातील व्यक्तिचित्रणे रेखाटली आहेत. काही पुरुष विद्रोही व्यक्तिमत्त्वाचे आहेत. जे जे प्रस्थापित आहे त्याविरुद्ध निषेध व्यक्त करणाऱ्या पुरुषांचे व्यक्तिचित्रण अनंत मनोहर करतात. यावरून अनंत मनोहरांचे समाजातील चौफेर असणारे लक्ष दिसून येते. त्यांना रोजच्या जीवनातील भेटणाऱ्याच व्यक्तींचे चित्रण ते करतात.

**संदर्भ :--**


१. मनोहर अनंत, : 'देवकाठी', मेघदूत प्रकाशन, प्रकाशन क्रमांक २, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९८४, पृ. ७१.

२. मनोहर अनंत, : 'कर्कोटक',मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे. प्रथमावृत्ती १५ डिसेंबर १९९१, पृ. २५.

३. उ. नि : पृ. ३१.

४. मनोहर अनंत, : 'देवकाठी', मेघदूत प्रकाशन, प्रकाशन क्रमांक २, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९८४, पृ. ८२, ८३.

५. मनोहर अनंत, : 'कर्कोटक', मधुराज पब्लिकेशन प्रा.लि. पुणे प्रथमावृत्ती १५ डिसेंबर १९९१, पृ. १३८.

६. उ. नि : पृ. ६०.

७. उ. नि : पृ. ६३.

८. उ. नि : पृ. १५६.

९. मनोहर अनंत, : 'देवकाठी' मेघदूत प्रकाशन, प्रकाशन क्रमांक २, सप्टेंबर १९८४, पृ. १९.

१०. उ. नि : पृ. २५.

११. मनोहर अनंत , : 'बिल्वपत्र', सुयोग प्रकाशन, प्रथमावृत्ती १५ डिसेंबर १९९१, पृ. ४.

१२. मनोहर अनंत, : 'देवकाठी' मेघदूत प्रकाशन, प्रकाशन क्रमांक २, सप्टेंबर १९८४, पृ. ६.

१३. मनोहर अनंत , : 'कर्कोटक', मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे, प्रथमावृत्ती १५ डिसेंबर १९९१, पृ. १२२.